## प्रकरण अकरावे

# समारोप

## प्रकरण अकरावे

## समारोप

संघाचा सारा अट्टाहास हा राष्ट्र जागृतीसाठीच चालू आहे गेली ७५ वर्षे संघशाखेच्या माध्यमातून संस्कारयुक्त कार्यकर्ते घडवीण्याचा जो प्रयत्न चालू आहे. त्या प्रयत्नातूनच ही हिंदुत्वाची राष्ट्रभक्तिची ज्योत देशाच्या कानाकोपऱ्यात पोचवत आहेत. समाजजीवनाचा सर्व क्षेत्रात सक्षम, सुयोग्य, सुसंस्कारीत निस्वार्थ वृत्तीने आर्थिक व्यवहारात हात स्वच्छ असलेले व राष्ट्र हेच परमदैवत मानून काम करणारे कार्यकर्ते निर्माण करणे व पूरविणे हे संघाचे उद्दिष्ट आहे. हे कार्य प्रभावी संघ शाखेच्या माध्यमातून घडत आहे. संघ दैनंदिन शाखा, नियोजनपुर्वक कार्यक्रम व अन्यविशेष कार्यक्रम यातून स्वयंसेवकांची अपेक्षित घडण यावर लक्ष केंद्रीत करतो. विद्यार्थी स्वयंसेवक तो शिशु, बाल, तरूण कोणीही असो अधिकाधिक अभ्यास करून वार्षिक परीक्षेत उत्तम तऱ्हेने पास होईल त्याचबरोबर नियमित व्यायाम करत राहील यावर लक्ष ठेवतो व हे केवळ सागत नाही तर त्यासाठी त्या स्वयंसेवकाशी आपला व्यक्तिगत संपर्क, अधिकाधिक सहवास व स्नेहभावना निर्माण करतो, स्वयंसेवकांच्या घरी सहजपणे जाणे येणे, सर्व सामान्यपणे कामासाठी एकत्र येणे, घरी जाणे असा प्रघात आहे. पण संघ कार्यपध्दतीत कामाशिवाय एकत्र येणे ,सहजपणे घरी जाणे, हेच काम मानले जाते. दैनदिंन शाखा म्हणजे कामाशिवाय एकत्र येणेच होय, गटपध्दती म्हणजे वैयक्तिक संपर्क, सहवास व प्रेमभावना वाढीस लावण्यासाठी असलेली यंत्रणा शाखेतील कार्यक्रम म्हणजे संस्कार याच आग्रही व सातत्यपूर्ण कार्यक्रमातून प्रतिकुल परिस्थितीवर मात करून संघ काम वाढत आहे.

रा. स्व. सघाच्या संस्थापकंसमोर निवडणूका जिंकणे हा क्षुद्र विचार नव्हताच सम्यक समाजाचे परीवर्तन करण्याच्या भेद रहीत समतेवर आधारीत नवा समाज उभारण्याचे त्यांचे स्वप्न होते. आज समर्थ हिंदु राष्ट्रही नजीकच्या भविष्यात दिसत नाही आणि समताधिष्ठित समाजही दिसत नाही त्यावेळही धर्मवेड, जातीयवाद, जाती उपजातींचे अभिमान, अराजकता, फुटीरता, चंगळवाद, उपभोगवाद, सत्तेसाठी वाटेल ते करण्याची तयारी, संधीसाधु, राजकारण, तत्वशुन्ययूत्या यांचे समाजावर वर्चस्व आहे.

असे का झाले च असे का व्हावे ? का या संघटनांचा मार्गच चूकीचा होता ? निश्चित काही सांगता येत नाही.

दैनंदिन शाखा, सुट्टीतील शिबीरे कुटुंबे जोडून घेणे, प्रेमाने माणसे जोडणे हे तंत्र शाखा म्हणजे रोज एका ठराविक वेळी मैदानावर एक तास जमावयाचे भगव्या ध्वजाला वंदन, खेळ काही शारिरिक , बौध्दीक कार्यक्रम , उपस्थिती मोजणे, प्रार्थना, भारतमातेला प्रणाम वैगरे कार्यक्रम हा उपक्रम.

पण सध्या संघाच्या शाखा रोडावलेल्या दिसतात , शाखांची संख्या आणि शाखेतील नियमीत उपस्थिती कमी झाली आहे . सध्यापर्यंत शाळेत अभ्यासेत्तर क्रिडा, कवायत, गीते, वैगरे कार्यक्रम नसत त्या काळात मुलांना या कार्यक्रमासाठी संघाच्या शाखेचे आकर्षण होते. आता शाळेतच विविध अभ्यासेत्तर उपक्रम चालतात. दिवसेंदिवस पालक आपल्या मुलांच्या करीयरबद्दल अधिकाधिक जागृत झाले आहेत. घरातही मुलांची संख्या एक किंवा दोन असते. या मुलांसाठी अगदी प्राथमिक शाळेपासून ट्युशन्स , शिकवणी वर्ग यांचा मारा केला जातो. दहावी बारावीच्या विद्यार्थ्यांच्या मागे तर पालक हात धुवून लागलेले असतात ट्युशन्सचे वेड हे शाखेचा एक मोठा शत्रु बनला आहे.

दुसरा अधिक प्रभावी शत्रु म्हणजे टी.व्ही आता घरोघरी मुले टी . व्ही ला इतकी चिकटलेली असतात की त्यांना घराबाहेर पडणे सुध्दा नको वाटते मग मैदानावर जावून शिस्तीने खेळावे हे फार लांबचे झाले. असे

म्हणावे लागते की एक काळ असा होता की शाखा सायंकाळी तर चालतच शिवाय सकाळी , रात्री सुध्दा शाखा चालत असत आता एका गावात एक शाखा भरघोस उपस्थितीत चालणे महामुश्किल बनले आहे.

मुलांना लहान पणीच एकत्र आणून त्यांच्यावर विशिष्ट संस्कार करावयाचे व त्यांना चारोटयसंपन्न नागरीक बनवायचे हा शाखापध्तीचा हेतु आहे. आज समाजात ती माणसे लहानपणी शाखेत लाभलेल्या संस्कारांचा अभिमानाने आवर्जुन उल्लेख करतात आता इथून पुढे मात्र अशी अपेक्षा ठेवता येणारी नाही . संस्कारहीन मंडळी विविध राजकीय पक्षात आघाडीवर दिसु लागली आहेत त्यांचे प्रमाण वाढत जाणार, शाळा, कॉलेजातील शिक्षणातून देशप्रेमाचे, सामाजिक बांधिलकीचे अन्यायाविरूध्द झुंज देण्याचे संस्कार लाभत नाहीत त्यामुळे उच्चविद्या विभूषीतांची संख्या समाजात वाढेल पण चांगल्या नागरिकांची उणीव मात्र सदैव राहील .

शाखा हा संघटनेचा आत्मा आहे. उर्जा निर्मीतीचे केंद्र आहे. पण वास्तवात पूर्वासारख्या शाखा भरत नाहीत हे कुटुसत्य मान्य करावे लागते संघटनेचे अस्तित्व शाखा या एकमेव निकषावर जाते.

शिवाजी महाराज हे संघाचे दैवत इतर कोणी शिवराज्याभिषेक दिन साजरा करीत नव्हते त्याकाळापासून एकटे बाल हा दिन भक्तिभावाने साजरा करतात संध्या शिवसेना शिवाजी महाराजांना आराध्य दैवत मानते, जय शिवाजी जय भवानी ही घोषणा त्यांनी लोकप्रिय केली संघवाले मुळचे शिवप्रेमी पण आता लोकांना ते आठवतही नाही माहीतही नाही शिवाजी महाराजांच्यावर परम श्रध्दा ठेवणारी एकमेव संघटना ही संघाची आयडेंटिटी आता राहीलेली नाही .

**निरीक्षण :-**

**जिल्ह्यातील संघ कामाचा आढावा घेत असता जे लक्षात आले ते थोडक्यात पुढील प्रमाणे आहे.**

१) १९५५ पर्यंत संघस्थानावर जो शारिरिक विरोध होत असे तो जवळ जवळ थांबलेला आहे.

२) संघ हा भटा बामणांचा आहे, तो मुस्लीमांचा व्देष्टा आहे. जुन्या टाकावू परंपराना चिकटून रहाणारा आहे या गैरसमजुतीने विरोध करणाऱ्यांची संख्या खूप कमी झालेली आहे. नव्या तरूण पिढीत हा विरोध फारसा नाही.

३) संघ समजून घेण्याची भूमिका नव्या पिढीत खुप आहे.

४) दैनदिन संघ शाखेचा आग्रह बैठकीपुरता सिमीत झाला आहे की काय असे शाखांचे स्वरूप पाहिल्यानंतर वाटते.

५) रोजी एक तासाची शाखा वेशातील संख्या किती ? याचे उत्तर निराशशजनक आहे.

६) १६ ते ३५ या वयोगटातील तरूण नैमित्तीक कार्यक्रमात असला तरी दैनदिनं शाखेत त्याची संख्या फारच कमी आहे.

७) संघ सांगून समजणार नाही, शाखेवर येऊन पहा. या ऐवजी संघ समजून सांगतो, पण शाखा कोणती दाखवायची हा प्रश्न आज उभा आहे.

८) कार्यकर्त्यामधील आपापसातील सहज आत्मीयता, कौटुंबिक जिव्हाळा, संपर्क याचे प्रमाणे कमी होत असून कामाला एक प्रकारचे व्यवसायिक स्वरूप वाढत्या प्रमाणात येऊ लागले आहे.

९) संघस्थानावर आकर्षक कार्यक्रम घेणाऱ्या कार्यकर्त्यांची संख्या कमी आहे. जिथे आकर्षक कार्यक्रम घेणारा कार्यकर्ता आहे त्या शाखेची उपस्थिती चांगली रहाते.

१०) संघ व परिवार क्षेत्रातील प्रासंगिक कार्यक्रमांना संख्या बऱ्यापैकी असते.

११) परिवार क्षेत्रातील कामाचा विस्तार वाढत असला तरी अनुशासन, शिस्तबध्दता व पायाभूत

संघटनात्मक बांधीी याची बरीच उणिव काही प्रमाणात विद्यार्थी परिषदेचा अपवाद वगळता बहुतेक सर्व परिवार क्षेत्रातील संस्थात आढळून येते.

१२) संघ कार्यक्रमात ग्रामीण भागातील सर्व जाती- जमातीतील बाल तरूण सहभागी होऊ लागले आहेत. नजीकच्या भविष्यकालीन संघ कामाच्या प्रगतीच्या दृष्टीने ही आशावादी घटना आहे.

१३) नवे नवे बाल तरूण यांची भरती म्हणजे कार्यकर्ता निर्मीतीच्या झऱ्याचे स्वरूप आहे.

१४) शाखा सुरु झाल्यानंतर बंद पडली नाही (बंदी काळ म्हणून) अशी फक्त दोन स्थाने आहेत. कोल्हापूर व इचलकरंजी.

आदर्श गटपध्दती हा संघ कामाचा कणा आहे असे मानले जाते पण अशी गटपध्दती अपवाद वगळता फारशी कार्यान्वित आहे असे वाटत नाही.